# हिरकणी विशेषांक २०२२



- संपादिका -
सायली विनय कुलकर्णी

## साप्ताहिक माझी सखी सोबती



सायली विनय कुलकर्णी
संपादिका

# संपादकीय...

जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिला भगिनींना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, प्रशासकीय व्यवसाय अशा सर्व आघाड्यावर महिला सक्षमपणे काम करीत आहेत.महिला आता अबला न समजता एक सक्षम महिला नारी म्हणून त्यांनी स्वतःला सिद्ध केले आहे.

महाराष्ट्र शासनाने १९९४मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वयंसहाय्यता बचत गटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

महिला सबला झाल्या असे जाहीरपणे बोलले जात असले तरी महिलांवर होणारे अन्याय आजही वर्तमानपत्रांमधून वाचनात येत आहेत हे थांबले पाहिजे तरच महिला सबला झाली असे म्हणता येईल.

आजही अनेक कुटुंबामध्ये महिलांवर हिंसाचार केला जातो त्या हिंसाचाराला अनेकवेळा महिलाच कारणीभूत असल्याचे दिसून येते त्यामुळे महिलांनी महिलांचे शत्रू बनू नये.उलटपक्षी आपली सहकारी महिला पुढे कशी जाऊन स्वतःची व समाजाची प्रगती करेल हे पाहणे गरजेचे आहे.तरच महिला सक्षम झाली असे म्हणणे योग्य ठरेल.



स्मिता राजेश पाटील
ट्रेकर

# आदर दया, आदर घ्या... !

स्त्रियांनी स्वत: च स्वत: वर बंधने घातली आहेत. स्त्रीने बंधनमुक्त होणे गरजेचे आहे. स्त्रियांनी बंधने तोडल्यास त्यांना जीवनाचा आनंद घेता येईल, अशा भावना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त राजेश पाटील यांच्या पत्नी स्मिता यांनी व्यक्त केल्या.

स्मिता राजेश पाटील यांचे मूळ गाव जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव मधील बोरखेडा (बुद्रुक). त्यांचे वडील गावातील पहिले अभियंता होते. ते महाराष्ट्र विद्युत महावितरण कंपनीत कामाला होते. स्मिता यांचे शिक्षण एम.एस्सी., एम एस (आयटी) , एम.एस.डब्ल्यू . पर्यंत झाले आहे. घरातील शेंडेफळ म्हणून त्या त्यांच्या सर्वांच्या आवडत्या होत्या. त्यांच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर त्यांना आयुष्याने वेगळ्या वळणावर आणले. त्यातून आपण कसे वागले पाहिजे, याचे अधिक चांगले ज्ञान झाले.आयुष्यात जे होणार आहे ते आपण टाळू शकत नाही. मात्र आपले विचार सकारात्मक असतील तर अडचणीवर सहज मात करता येते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सध्याचे आयुक्त राजेश पाटील यांच्याशी त्या २००४ मध्ये विवाहबद्ध झाल्या. त्यांच्या सासूबाईंनी त्यांची आईप्रमाणेच काळजी घेतली. त्यांच्या प्रत्येक अडचणींवर त्यांनी मार्ग काढले. त्यामुळंच सासूबाई त्यांना आईसारख्याच वाटतात. नाशिकसारख्या शहरात शिकूनही खेड्यातील मुलासवेत कसे काय लग्न केले, असा प्रश्न त्यांच्या मित्र परिवाराला पडत असे. पण त्यांच्यावर आजोबांचा (रामराव) प्रभाव होता. ते मुख्याध्यापक होते. आजोबांचा त्यांच्यावरील असलेल्या प्रभावामुळे व आयुक्त राजेश पाटील यांचे सद्गुण हेरुन त्यांच्याशी विवाह करण्याचा सल्ला दिला. त्यांनी खेड्यातील मुलांसमवेत विवाह करण्याचा निर्णय घेतला.

स्मिता यांना ऑनलाईन कोर्सेस करण्याची आणि वाचनाची खूप आवड आहे. त्यांनी हिमालयात चार वेळा ट्रेकिंगची केले आहे. त्याचबरोबर कविता वाचायला आणि सतत काही ना काही नवीन शिकायला त्यांना आवडते.

विवाहानंतर त्या प्रथमच दिल्लीला गेल्या. त्यावेळी प्रथमच त्या महाराष्ट्राबाहेर गेल्या होत्या. आयुक्त पाटील २००५ मध्ये आयएएस झाले. त्यानंतर पुढील प्रशिक्षणासाठी ते मसुरीला गेले. त्यावेळी सिद्धार्थ या त्यांच्या पहिल्या अपत्याचा जन्म झाला. त्यानंतर १५ ते १६ वर्षे त्या पतीसमवेत ओरिसा येथे होत्या. तेथील भाषा, वागल्याची पद्धत सर्वच काही नवीन असल्याने सुरवातीला त्यांना त्रास झाला. पण त्यातूनही त्या बरेच काही शिकल्या. तेथील भाग नक्षलवादी असल्यामुळे फिरण्यावर बंधने असायची. तेथे दिवसही साप निघायचे.

एका अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) माध्यमातून आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्या प्रथम तेथील उडिया भाषा शिकल्या. तिथल्या चालीरीती समजून घेतल्या. त्यानंतर आदिवासींचे प्रश्न समजून घेतले. त्यांना रोजगाराबाबत, शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले. जे घडणार आहे त्याचा कधी विचार करायचा नाही, त्यांनी मनाशी ठरविले होते. त्यामुळे १५ ते १६ वर्षे त्या तेथे काम करु शकल्या. त्यांचा मोठा मुलगा सिद्धार्थ हा अकरावी कॉमर्सला शिकतो तर धाकटा आदित्य हा सातवीत शिकतो. ते दोघेही उत्तम बॅडमिंटन खेळतात.

आयुष्यात कोठे थांबायचे हे त्यांना कळले आहे. निरोगी राहणे जास्त महत्वाचे आहे. कोणाविषयी मनामध्ये काही धरुन ठेवू नका, सोडून द्यायला शिका, असे त्यांना वाटते. आदर द्या आणि आदर मिळवा, अशी त्यांची भावना असते.



**''ज्यांच्या नावातच आनंद व स्मितहास्य आहे अशा स्मिता नावाच्या हिरकणी यांस साप्ताहिक माझी सखी सोबतीचा मानाचा मुजरा.''**





डॉ. प्रेरणा बेरी-कालेकर
वैद्यकीय क्षेत्र

# महिलांनी स्वतःच्या आरोग्यास प्राधान्य दयावे !

महिला अनेक क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवीत आहेत. दिवसेंदिवस त्यांच्या संख्येत वाढही होताना दिसत आहे. मात्र महिलांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या महिलाही आहेत. पिंपरी-चिंचवडमधील डॉ. प्रेरणा बेरी-कालेकर हे नाव त्यापैकीच एक आहे.

पुण्यातील डॉ. प्रेरणा बेरी या गेली १७ वर्षांहून अधिक काळ वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आयुर्वेदातील पदवी मिळविली आहे. त्यांचे सर्व शिक्षण पुणे येथेच झाले आहे. केवळ आयुर्वेदातील पदवी मिळवून त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी योगा आणि हर्बल अँड कॉस्मेटिक्समधील मधील पदविकाहि मिळविली आहे.
ऊर्जा आयुर्वेद पंचकर्म सेंटरच्या माध्यमातून त्या पुणे आणि पिंपरी - चिंचवडमध्ये कार्यरत आहेत. हर्बल कॉस्मेटिक्स कशी तयार करावीत, या विषयावर त्या कार्यशाळाही घेतात. त्याचा महिलांना खूप उपयोग होताना दिसतो.

आपल्या कामाच्या वेगळ्या पद्धतीमुळे आणि संशोधक वृत्तीमुळे त्यांनी या क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. महिलांनी स्वतः च्या आरोग्यास प्राधान्य द्यायला हवे, याबाबत त्यांचा आग्रह असतो. त्यासाठी त्यांनी योग्य आहार, व्यायाम, योग्य झोप आणि आनंदी राहणे, हाच आरोग्याचा मंत्र आहे, असे त्या नेहमी आवर्जून सांगतात. त्याचप्रमाणे महिलांसाठी आर्थिक स्वावलंबन ही बाब खूप महत्वाची आहे. महिलांनी स्वत:वर विश्वास ठेवावा. महिलांमध्ये खूप क्षमता असते. या क्षमतेचा त्यांनी योग्य वापर करायला हवा.

आयुर्वेदातून खूप चांगल्या प्रकारे सौंदर्य जोपासना होऊ शकते, यावर त्यांचा विश्वास आहे. आपण आरोग्यदायी असलो तर आपली त्वचा आणि केस यावर ते प्रतिबिंबित होते. त्यासाठी रसायन विरहित उत्पादने वापरावीत, यावर त्या भर देतात. कारण अशी उत्पादने वापरल्याने मिळणारे परिणाम दीर्घकाळ टिकणारे असतात. सौंदर्य प्रसाधनांमध्ये जेवढी रसायने कमी वापरलेली असतील तेवढे त्यांचे दुष्परिणाम कमी असतात. त्यांनी विविध वृत्तपत्रातून लेखहि लिहिले आहेत. तसेच अनेक ठिकाणी व्याख्यानेही दिली आहेत. तसेच कार्यशाळा आणि शिबिरेही घेतली आहेत. महिलांच्या आरोग्याच्या क्षेत्रात तर त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्या मिसेस इंडिया ब्युटीफुल २०१८ च्या विजेत्या आहेत. महिलांच्या आरोग्याच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे.त्यांना आतापर्यंत

'नारी शक्ती पुरस्कार', 'ग्लोबल आयकॉन पुरस्कार', 'नवदुर्गा पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. या व्यतिरिक्त त्या 'मेडीक्वीन मेडिको प्याजेन्ट' च्या त्या संचालिकाही आहेत.

त्यांना ट्रेकिंग, निसर्गरम्य वातावरणात स्वच्छंदपणे फिरणे हा त्यांचा छंद आहे. दैनंदिन जीवनात सकारात्मकता ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही नकारात्मक घटनेने खचून न जाता पुन्हा उठून चालत राहणे गरजेचे आहे. थांबला तो संपला हे कायम लक्षात ठेवा. कासवाच्या गतीने का होईना कार्यरत राहणे गरजेचे आहे. नकारत्मकता झुगारुन पुन्हा उभे राहणे हे स्त्रियांसाठी महत्वाची शिकवण आहे.




**ज्यांच्या नावात व विचारात प्रेरणा आहे अशा डॉ प्रेरणा नावाच्या हिरकणी यांस साप्ताहिक माझी सखी सोबतीचा मानाचा मुजरा .**



शीतल सुधाकर पवार
कार्यकारी संपादक
सकाळ माध्यम समूह

# पतीचा पाठींबा असल्यास करियरची जडणघडण होते!

समाजाची मानसिकता, कामाचे दीर्घकालीन तास, अनिश्चित वेळा, प्रवास, ताण या सगळ्यांवर मात करत मराठी माध्यम क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवण्याचं धाडस करणाऱ्या काही महिलांमध्ये शीतल पवार हे नाव प्राधान्याने घ्यावं लागेल.

संगणक अभियांत्रिकी आणि सामाजिक संशोधन अशा दोन स्वतंत्र विद्याशाखांमधून शिक्षण घेऊन शीतल यांनी माध्यमांच्या क्षेत्रात पाऊल ठेवले. माध्यमांमध्ये होत असलेले बदल, माध्यमांच्या वाचक-प्रेक्षक यांच्यात होत असलेले बदल आणि या साऱ्या बदलांचा समाजावर होणारा परिणाम हा त्यांच्या अभ्यासाचा विषय राहिला आहे.

समाजमाध्यमे, डिजिटल माध्यमे यांच्याद्वारे क्षणोक्षणी होणाऱ्या माहितीचा भडिमार आणि त्यातून वर्तमानपत्रासारख्या माध्यमाची विश्वासार्हता टिकविणे, अशा आव्हानात्मक क्षेत्रात त्यांचे संशोधन आणि अभ्यास सुरू आहे.

धुळे शहरातल्या एका सुखवस्तू कुटुंबात त्यांचा जन्म झाला. आई-वडील दोघेही सरकारी नोकरीत. त्यामुळे शिक्षणाचा आग्रह स्वाभाविकपणे आलाच. पुढे त्यांनी पुण्यात येऊन कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचं शिक्षण पूर्ण केलं. दीपस्तंभ संस्थेचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन यांच्याशी भेट झाली. शितल सांगतात कि सरांनी मला पहिल्याच भेटीत सांगितलं, 'तुझ्या आवडी आणि स्किल्सबद्दल ऐकून मला वाटतं तू अधिकारी होण्यापेक्षा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सला पुढचं शिक्षण घे.' काही महिने दीपस्तंभसाठी कामही केलं.

अभियांत्रिकीच्या शिक्षणानंतर शीतल यांनी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून (ढखडड, मुंबई) समाज विज्ञान शाखेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं. यानंतर त्यांनी वेगवगेळ्या सामाजिक संस्थांसोबत काम केलं. प्रवास, लोकांना भेटणं, चळवळीत सहभाग, वाचन आणि लिखाण यातून शिक्षणासोबत जगण्याचा अनुभवही समृद्ध होत गेला.

तुलनेने कमी वयात असा वैविध्यपूर्ण अनुभव प्राप्त केल्यानंतर शितल 'सकाळ' माध्यम समूहात वाचकगटाच्या अभ्यासासाठी दाखल झाल्या. त्यादरम्यान त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून माध्यम विषयातील पदव्युत्तर शिक्षणही पूर्ण केलं. वाचकांची अभिरुची, त्यांच्या गरजा यावर त्यांनी अभ्यास केला. कालांतराने मार्च २०१८ मध्ये सकाळ माध्यम समूहात कार्यकारी संपादक- एक्झिक्युटिव्ह कन्टेन्ट क्युरेटर या पदावर त्यांची नियुक्ती झाली. या पदावर काम करताना त्यांनी आजच्या आणि उद्याच्या वाचकाच्या दृष्टिकोनातून वर्तमानपत्रातील आशयामध्ये बदलाला प्राधान्य दिले. वाचकाच्या गरजा ओळखून डिजिटल आणि सोशल मीडियाद्वारे पारंपरिक माध्यमांशी संवादाची व्यवस्था अवलंबली.

विभिन्न क्षेत्रांमध्ये काम करताना राजकीय व्यवस्थांचे एकूण समाजरचनेत असलेले महत्वाचे स्थान हा त्यांच्या आवडीचा विषय राहिला. अशा व्यग्र आणि समाजाशी सतत जोडल्या राहणाऱ्या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या शितल यांचे पती आशिष पाटील हे संगणक अभियंता आहेत. त्यांचे क्षेत्र पूर्णतः निराळे आहे. करियर आणि आईपण याची कसरत सांभाळताना पतीचा संपूर्ण पाठिंबा असेल, तरच अशा वैविध्यपूर्ण करियरची जडणघडण करता येते, याची त्यांना जाणिव आहे.

**ज्यांच्या नावात व व्यक्तिमत्वात शीतलता आहे, अशा शीतल नावाच्या हिरकणी यांस साप्ताहिक माझी सखी सोबतीचा मानाचा मुजरा.**





रश्मी देशमुख पापळकर
आर.पी.टी.एस.
संचालिका

# महिलांनी स्वत:मधील स्वला शोधावे !

'' सध्याच्या काळाची गरज काय आहे, हे ओळखून स्वत: ला तयार करा. ' कम्फर्ट ' झोन तोडा आणि स्वतः मधील स्व ला शोधा , '' असे पुण्यातील आरपीटीएस या संस्थेत कौशल्य विकास संस्थेत संचालक व मुख्य प्रशिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या रश्मी देशमुख पापळकर यांचे महिलांना सांगणे आहे.

रश्मी यांनी मीडिया मॅनेजमेंट या विषयातून पुण्यातून एमबीए केले आहे.' आरपीटीएस ' च्या माध्यमातून गेल्या दहा अधिक वर्षांपासून राजकीय, सामाजिक व व्यावसायीक क्षेत्रात कार्यरत लोकांना वक्तृत्व शिकवण्याचं काम त्या करीत आहेत. त्यात बऱ्याच राजकीय उमेदवारांना निवडणूक जिंकून येण्यासाठी त्यांचा वक्तृत्व विकास करून मदत केली आहे. व्यावसायिक लोकांना व्यावसायिक मिटिंग यशस्वी करण्यासाठी शिकवलेल्या संवाद कौशल्याचा उपयोग झाला आहे आणि होत आहे. बऱ्याच लोकांना नोकरीमध्ये पुढे जाण्यासाठी उपयोग झाला आहे. १५००० हुन अधिक लोकांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांसाठी देखील नवीन उपक्रम राबवण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.

संस्थेच्या वतीने अतिशय माफक दरामध्ये आज संपूर्ण महाराष्ट्रातील अगदी गावखेड्यातील लोकांपर्यंत ऑनलाईनच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येते.

त्यांना आतापर्यंत विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. भारतातील उत्कृष्ट वक्ता म्हणून २००० मध्ये त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्यामध्ये भारताचे सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून २०११ मध्ये त्यांना गौरविण्यात आले आहे. या व्यतिरिक्त २०१८ मध्ये महाराष्ट्र अस्मिता गौरव पुरस्कार, २०१९ मध्ये बेस्ट वूमन आंत्रप्रेनूर अवॉर्ड २०२१ मध्ये युथ आयकॉन असे विविध पुरस्कार मिळाले आहेत.

त्या मूळच्या जळगावच्या आहेत. पण त्यांची आई, दादा, वहिनी हे आता पुण्यामध्येच असतात. त्या पती पुष्कर पापळकर व मुलगा अर्णव यांच्यासमवेत पुण्यात स्थायिक आहेत. त्यांचे सासर नागपूर आहे.

डान्स हा त्यांचा आवडता छंद आहे. जर त्या या क्षेत्रात नसत्या तर नक्कीच कोरिओग्राफर झाल्या असत्या असे त्यांना नेहमी वाटते. त्यांनी राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या स्पर्धांमध्ये डान्स केला आहे.

त्यांचा मोठा भाऊ श्री. राहुल प्रमोद देशमुख हे त्यांच्यासाठी आदर्श आहेत. त्यांच्या दादामुळे त्यांना बरेच काही शिकायला मिळालं आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये तो त्यांच्या सोबत खंबीर उभा असतो. स्वतः सोबत समाजासाठी आदर्श काम करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. महिलांनी मनाची ताकत मजबूत करावी. स्वत:शी सकारात्मक सवांद साधावा.

**ज्यांच्या नावातच आणि कर्तृत्वात रेशम आहे, अशा रश्मी नावाच्या हिरकणी यांस 'साप्ताहिक माझी सखी सोबती' चा मानाचा मुजरा.**

मोबाईल ९५७९९९६१६१ वेबसाईट : www.rashmideshmukh.com



श्वेता कुलकर्णी
उद्योजिका


# महिलांनी खचून जाऊ नये !

विपरीत परिस्थितीपुढे अनेक जण शरणागती पत्करतात किंवा खचून जातात. मात्र परिस्थिती बिकट झाली तरी अशा परिस्थितीने निराश न होता नव्या उमेदीने महिलांनी कार्यरत राहायला हवे, अशी अपेक्षा केटरिंग व्यावसायिक श्वेता कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

श्वेता शैलेंद्र कुलकर्णी यांचे शिक्षण पुण्यात झाले. नेस वाडिया महाविद्यालयातून त्यांनी ' बी कॉम ' ची डिग्री संपादन केली. त्या जसजशा या व्यवसायात आल्या तसतशा समाज त्यांना अधिक चांगल्या प्रकारे कळू लागला. व्यवसायात केवळ पैसे कमावणे हा उद्देश ठेवून काम न करता आपणसुद्धा समाजाचे देणे लागतो , हे त्यांनी ओळखले. कोविड १९ च्या कालावधी त्यांनी हा अनुभव घेतला. व यापुढे समाजासाठी जेवढे जमेल तेवढे त्यापेक्षासुद्धा काकणभर जास्तच आपण समाजाला द्यायचे, असा त्यांनी निर्धार केला. त्यांचे सासरे अनंतराव कुलकर्णी चिंचवड येथील श्रीधरनगर मंदिराचे अध्यक्ष आहेत. पती शैलेंद्र कुलकर्णी हे केंद्र सरकारच्या संशोधन आणि विकास विभागात कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा वरद हा सुद्धा त्यांना त्यांच्या व्यवसायात मदत करतो. या व्यतिरिक्त त्याचा स्वतः चा स्वतंत्र व्यवसाय आहे.

या व्यवसायाबरोबर त्या आणि त्यांच्या सहकारी चिंचवड येथील भारत माता भवन येथील मुलांकरिता संस्कार वर्ग चालवितात. येथील छात्रावासातील मुलांचा अन्नपूर्णा कक्ष सांभाळतात. या शिवाय त्या श्रीधरनगर मधील दत्त मंदिरात कार्यकारी म्हणूनही काम पाहतात. तसेच पंढरपूर वारीमधील आळंदी ते पंढरपूर या वारीतील दिंडी क्रमांक ४ च्या भोजन व्यवस्थेची जबाबदारीही त्या सांभाळतात. एवढा सर्व व्याप सांभाळून त्या पुस्तके वाचनाचा आणि बागकामाचा छंद जोपासतात. त्यांचे आई वडील हे त्यांच्यासाठी प्रेरणादायी व्यक्ती आहेत.

ज्यांच्या नावातच 'श्वेत' आहे, अशा श्वेता - नावाच्या हिरकणी
यांस 'साप्ताहिक माझी सखी सोबती' चा मानाचा मुजरा.



आशादेवी दुरगुडे
सहाय्यक आयुक्त
पिंपर चिंचवड महापालिका

# महिलांनी उच्च शिक्षण घ्यावे!

महिलांनी उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदावर काम करावे. शिक्षण घेऊन स्वतःची आणि कुटुंबाची प्रगती साधावी. योगा, प्राणायाम, ध्यान याच्या माध्यमातून महिलांनी आरोग्य सांभाळावे, अशी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सहआयुक्त आशादेवी मारुती दुरगुडे यांची अपेक्षा आहे.

आशादेवी मारुती दुरगुडे यांचे शिक्षण एम. ए., एल. एस. जी. डी., एल.जी.एस, डी.एल.जी.एफ.एन. असे झाले आहे. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण भीमाशंकर विद्यामंदिर, शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे झाले. त्यानंतर टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून त्यांनी एम. ए. ची डिग्री मिळविली. विविध शालेय स्पर्धांमध्ये त्या भाग घेत असत.

महापालिकेत १९८३ मध्ये त्या लिपिक म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर मुख्य लिपिक, कार्यालय अधीक्षक, प्रशासन अधिकारी, सहायक आयुक्त अशा विविध पदांवर त्यांनी काम केले. क्षेत्रीय स्तरावर काम करीत असताना स्वच्छ भारत अभियान, प्रशासकीय काम, आपत्ती व्यवस्थापन विभागातील काम अतिशय प्रामाणिकपणे केले. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांनी नेमणूक केलेल्या विभागात दुरगुडे यांनी त्यांचे काम अत्यंत चोखपणे केले. मिळकतकर निरीक्षक या पदावर काम करीत असताना त्यांनी स्वतःच्या मोटारीतून साईटवर जाऊन कर वसूल केला.

त्याचप्रमाणे जानेवारी ते मार्चअखेर एकही साप्ताहिक सुटी न घेता मिळकतकर वसुलीचे काम सक्षमपणे केले. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत भर पडली.

त्यांची मुलगी शिल्पा यांनी बी. एस्सी. (नर्सिंग) चे शिक्षण घेतले असून त्या विवाहित आहेत. त्यांचा मुलगा ओम संगणक अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे.

दुरगुडे केवळ नोकरीच न करता सामाजिक भानही जपतात. त्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करतात. वडिलांनी स्थापन केलेल्या ग्रंथदिंडीचे कार्य त्यांनी गेली २० वर्षे सुरु ठेवले आहे. यासह त्या गरजूंना अन्नदान, वस्त्रदान करीत असतात. त्यांना अध्यात्मिक साहित्य वाचनाची आवड आहे.

महापालिकेच्या उपायुक्त आशादेवी दुरगुडे यांना सहआयुक्त म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे त्या महापालिकेच्या पहिल्या सहआयुक्त ठरल्या आहेत. त्यांच्याकडे मध्यवर्ती भांडार, नागरी सुविधा केंद्र हे विभाग राहणार आहेत.

त्यांचे वडील पुणे जिल्हापरिषद सदस्य होते तर आई सगुणा उमाकांतर तारडे या शिक्षिका होत्या. दुरगुडे यांची बहीण उषादेवी भारमळ या डॉक्टर आहेत.

**ज्यांच्या नावातच व कामातच आशेचा किरण असणाऱ्या अशा आशादेवी नावाच्या हिरकणी यांस साप्ताहिक माझी सखी सोबतीचा मानाचा मुजरा.**





प्रेरणा शिनकर
कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महापालिका

# मुलगा व मुलगी असा भेदभाव नसावा !

स्त्रियांनी व्यावसायिक क्षेत्रात काम करतांना कुठलेही आव्हान पेलण्याची तयारी ठेवावी. मिळालेल्या प्रत्येक जबाबदारीचा, संधीचा निर्भीडपणे स्वीकार करावा. तसेच यशासाठी संपूर्णपणे झोकून द्यावे, असा कानमंत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील पहिल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) प्रेरणा शिनकर यांनी दिला.

एस.एस. व्ही.पी.एस. कॉलेज धुळे येथे झाले व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून शिनकर यांनी बी.ई. (स्थापत्य) पर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. तसेच संगणक क्षेत्रातील आधुनिक पदविकाही त्यांनी मिळविली आहे. या व्यतिरिक्त त्यांनी ऍथलेटिक्स, बास्केटबॉल, हँडबॉल, कथक आणि भरतनाट्यम नृत्य, वक्तृत्व यामध्येही प्राविण्य मिळविले आहे. पदवीच्या शिक्षणानंतर त्यांनी सुरवातीला पुण्यातील कुसरो वाडीया महाविद्यालयात दोन वर्षे व्याख्याता म्हणून काम केले. त्यानंतर गेली २६ वर्षे त्या पिंपरी चिंचवड महापालिकेत कार्यरत आहेत.

त्यांनी आतापर्यंत जलनि:सारण विभागात पाणीपुरवठा व जल:निसारण विभागात १८ वर्षे, नरगरचना विभागा ५ वर्षे काम केले. त्यानंतर फ प्रभागात विविध विकासकामांवर काम केले. कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती झाल्यावर थेरगाव येथील डांगे चौकातील ग्रेड सेपेरटरचे काम केले. महानगरपालिकेत काम करीत असतांना त्यांची दोन वेळा ' गुणवंत कर्मचारी ' म्हणून निवड झाली आहे.

त्यांची आई प्राध्यापिका तर वडील न्यायाधीश होते. महाविद्यालयातील सहपाठी प्रदीप शिनकर यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. त्यांना एक मुलगा असून तोसुद्धा स्थापत्य अभियंता आहे. नोकरीमध्ये यशस्वी होण्यामागे पतीचे पूर्ण सहकार्य असल्याचे त्या नमूद करतात. निवृत्तीनंतर समाजासाठी पूर्णवेळ काम करण्याची त्यांची इच्छा आहे. विपश्यना, निसर्ग सान्निध्यात भटकंती करणे, वाचन, संगीत या बाबींची त्यांना आवड आहे.

मुलगा किंवा मुलगी असा भेद नसावा, अशी शिकवण त्यांना त्यांच्या आईकडून मिळाली. प्रत्येक स्त्रीने आपले मूल घडविताना मुलगा / मुलगी असा भेदभाव करु नये. दोघांना समान न्याय आणि संधी द्यावी व एक चांगला ' नागरिक ' , चांगला ' माणूस ' घडवावा असे त्यांना वाटते.

महापालिकेत नोकरी करताना अनेकांचे सहकार्य लाभले. त्यांचे पहिले वरिष्ठ प्रल्हाद चौधरी यांचे अनमोल सहकार्य आणि मार्गदर्शन लाभल्याचे त्या नम्रपणे नमूद करतात. महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ श्रीकर परदेशी हे त्यांचे प्रेरणास्थान आहेत. एक अधिकारी त्याच यंत्रणेकडून समाजासाठी काहीतरी ठोस करू शकतात, संस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडवू शकतात आणि त्याद्वारे जनमानसात मानाचे स्थान निर्माण करू शकतात, हे दिसून आले.

थोडक्यात महिलांनी त्यागमूर्ती किंवा सुपरवूमन होण्याच्या संकल्पनेत अडकू नये. आपण आधी माणूस आहोत, हे कायम लक्षात ठेवावे. आपली अस्मिता , आनंद आणि आरोग्य जपावे व हे संस्कार आपल्या मुलांवरही करावेत, अशी त्यांची अपेक्षा आहे.

**ज्यांच्या नावातच प्रेरणा आहे, अशा प्रेरणा नावाच्या हिरकणी यांस साप्ताहिक माझी सखी सोबतीचा मानाचा मुजरा.**



सुमेधा सुधीर ओजाळे
रेडिओ निवेदिका

# स्वतःची ओळख स्वतः बनवा !

सासर आणि माहेरला जोडा. मी पणा सोडा , स्वतः ला ओळखा, स्वतः ची ओळख बनवा, असा निवेदिका सुमेधा सुधीर ओजाळे यांचा महिलांना सल्ला आहे.

सुमेधा याचे शिक्षण बीए. बीएड. पर्यंत झाले आहे त्यांनी वक्तृत्व कलेवर प्रभुत्व मिळविले आहे. त्यांच्याप्रमाणे संभाषण कलेमध्येही प्राविण्य मिळविले आहे. सध्या त्या ' मराठी तरंग रेडिओ ' या रेडिओस्टेशनवर ' निवेदिका ' म्हणून कार्यरत आहेत.

रेडिओ स्टेशनच्या माध्यमातून त्या निरनिराळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्यांच्या मुलाखती घेऊन रेडिओस्टेशन वर प्रसिद्ध करतात. त्यांचा एकुलता एक मुलगा आंतरराष्ट्रीय बँकेत व्यवस्थापक आहे.
केवळ करिअरकडेच लक्ष न देता सामाजिक कार्यातही त्या अग्रेसर असतात. श्रीमती रमाबाई रानडे चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत त्या महिलांसाठी स्वयंरोजगार आणि आरोग्य शिबिरे घेतात. फिरणे, कविता करणे, माणसं जोडणे अशा बाबींचा त्यांना छंद आहे. त्यांचे पती त्यांच्यासाठी प्रेरणादायी व्यक्ती आहेत. चांगली निवेदिका होणे, हे त्यांचे स्वप्न आहे.

मुलाखत या विषयावर त्या भरभरून बोलतात. मुलाखत घेणार्याने मुलाखत देणाऱ्याला प्रश्न हा अचूक, विनोदी आणि त्याचा ताण कमी करणारे करावेत. मुलाखत देणारा गोंधळतोय, असं लक्षात येताच ठीक आहे, असे म्हणून दुसऱ्या प्रश्नाकडे वळावे. काही शब्द मुलाखत देणार्याला सुचत नसल्यास मुलाखत घेणाऱ्याने योग्य शब्द वापरून वाक्य पूर्ण करावे. मुलाखत देणारा फारच बडबडतोय, असं लक्षात आल्यास किंचित मान हलवून थांबण्याचा इशारा करावा. तेही न जमल्यास थांबण्यासाठी हात दाखवावा. जर व्यासपीठावर मुलाखत घेत असल्यास काही इशारे मुलाखत देणाऱ्याला आधीच सांगून ठेवावेत, म्हणजे ऐनवेळी गोंधळ उडत नाही.

मुलाखत हलकी फुलकी होण्यासाठी मुलाखत घेणारी व्यक्ती उत्साही आणि आनंदी असावी. तसेच मधेच छोटे किस्से किंवा विनोद करावेत, जे ऐकायला बरे वाटतील मुलाखतीच्या शेवटाकडे जाताना आता एक शेवटचा प्रश्न असं न म्हणता मुलाखतीचा शेवट करताना मला आपल्याला असा प्रश्न विचारावासा वाटतो असं बोलावं. नेहमीप्रमाणेच धन्यवाद न म्हणता तुमची मुलाखत घेऊन आमच्या ज्ञानात नक्कीच भर पडेल, असं म्हणावं. त्यानंतर मग धन्यवाद, असे म्हणून मुलाखत संपवावी.

अशा प्रकारे मुलाखत कशी घ्यावी याबाबतची महिलांना त्यांनी माहिती दिली.

**ज्यांच्या नावातच सुमेध असणाऱ्या, अशा सुमेधा नावाच्या हिरकणी यांस साप्ताहिक माझी सखी सोबतीचा मानाचा मुजरा.**

# With best Compliments

## From Well Wisher

**A & T Infrastructure**
Bhosari, Pune - 26.
Prop. Tejas Ukale
Gov. Contractor
M.: 8329700045

**Licence Architect**
Kasarwadi
Prop. Vipul Pagariya
M.: 9503400800

**S.S.D. Promoters & Builders**
Sr. No. 31, Rahatani

**Excel Engineering**
Gov. Contractor

**T AND T INFRA LTD.**
Bibvewadi-Kondhwa Road, Marketyard, Pune

**Sai Seva Enterprises**
Gov. Contractor

# Happy Women's Day

enviro safe
Consultants

**ARCHITECTURAL, INFRASTRUCTURAL & PROJECT MANAGEMENT CONSULTANTS**


**PUNE BRANCH OFFICE**
Survey No.10/1B, Flat No. 03, Bhramhagiri Apartment,
Ganga Nagar, Sangvi, Pune-411 027.
Mobile No. 9923196999

**SOLAPUR HEAD OFFICE**
278, West Mangalwar Peth,
Solapur - 413 002
Mobile No. 9823112151, 9823112171

Email: envirosafe.consultants@gmail.com
Website: www.envirosafe.co.in


WE ARE COMMITTED FOR SAFE ENVIRONMENT